**प्रति,** **दिनांक-** 30 /07 /2020.

मा.उपवनसंरक्षक,
घोड प्रकल्प वनविभाग जुन्नर,
दादोजी कोंडदेव वाडा, ता जुन्नर जि पुणे

**विषय:-** वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत कलम 2 अंतर्गत, मौजे करंजाळे ता जुन्नर जि पुणे येथील वन जमीन गट नं.120 मधील 0.121 हेक्टर क्षेत्र पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, इंन्सुलेटेड ईलेक्ट्रीक लाईन, एरियल आयर्न केबल, केबल कार करीता व अस्तित्वातील पाय-या कायम करणे बाबतचा प्रस्ताव.

**संदर्भ:-** आपले कार्यालयात संबंधित कक्ष यांनी दिलेल्या सुचना.

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने विनंती करण्यात येते की, मौजे करंजाळे ता जुन्नर जि पुणे येथील वन जमीन गट नं.120 मधील 0.093 हेक्टर क्षेत्र पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, इंन्सुलेटेड इलेक्ट्रीक लाईन, केबल कारसाठी एरियल आयर्न केबल व अस्तित्वातील पाय-या कायम करणे बाबत वनक्षेत्र मिळण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव आपले कार्यालयास सादर केलेला आहे. त्यामध्ये संदर्भिय सुचनेनुसार आवश्यक दुरुस्ती करणे आवश्यक होते. प्रकरणात दिलेल्या सुचनेनुसार खालील नमुद केले प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

1. सदर प्रकरणात Online forest area व non forest land चे क्षेत्र नव्याने दुरुस्ती प्रमाणे भरण्यात आले आहे.

2. केबलकार साठीच्या हवेतील ऑयर्न वायरचे क्षेत्र 30 मी. ऐवजी नव्याने दुरुस्ती नुसार 100 मीटर करुन प्रस्तावात तशी दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यानुसार नव्याने एकुण वनक्षेत्र 0.121 हेक्टरचा प्रस्ताव तयार करुन या सोबत सादर करण्यात आला आहे.

3. C.A. Land- आपल्या स्तरावरुन वनपरिक्षेत्र अधिकारी ओतूर कडून प्राप्त करुन घेण्यास विनंती आहे.

4. प्रस्तावात Alternative Alignment Map जोडण्या बाबत सुचना आहेत. त्यानुसार Alternative Alignment दर्शवुन नकाशा सादर करण्यात आला आहे. यामध्ये पाय-या जुन्या आहेत .त्यामुळे पाय-या बाबत पर्याय दर्शविण्यात आला नाही.

5. प्रस्तावातील प्रमाणपत्र क्र. 28 व 40 च्या अनुषंगाने ग्रामपंचायत ठराव देणेचे निर्देश होते. तथापी सध्या कोविड-19 या महामारीची साथ सुरु असल्याने ग्रामपंचायतीच्या बैठका होत नाहीत. तरी सदर प्रकरणी पुर्तता करण्या बाबत दक्षता घेण्यात आली आहे.

6. प्रकरणात Geo Digital Map आपले स्तरावरुन अंतर्भूत करण्यात यावा ही विनंती.

7. प्रस्तावात Wildlife Map सादर करणे बाबत सुचित करण्यात आले आहे. प्रकरणी प्रस्तावात भिमाशंकर Wildlife चा नकाशा जोडण्यात आला आहे. तरी प्रकरणी 7 प्रतीत नव्याने प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तरी प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयाकडे आपले कार्यालयाकडील पुर्तता करुन मंजूरीच्या अनुषंगाने पाठविण्यात यावा ही नम्र विनंती आहे.

(सं.श्री.औटी)
प्राधिकृत प्रतिनिधी तथा जमीन मालक
दोस्ती अ‍ॅग्रो टुरिझम सेंटर,
मौजे करंजाळे ता .जुन्नर जि पुणे.

30.7.2020
आवक / जावक लिपिक
उप वनसंरक्षक कार्यालय
घोड प्रकल्प वनविभाग
तहसिल कार्यालयाजवळ
जुन्नर, जि. पुणे ४१०५०२